विभागीय चौकशीची कार्यवाही चालू असताना चौकशी अधिकारी सेवानिवृत्त झाला तर त्या विभागीय चौकशीच्या प्रकरणात पुढील कार्यवाही करण्याबाबतच्या सुचना.

**महाराष्ट्र शासन,**
सामान्य प्रशासन विभाग,
परिपत्रक क्र.सीडीआर-१००४/प्र.क्र.२/०४/११,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- २८.०६.२००४

**परिपत्रक :-**

म.ना.से.(शिस्त व अपील) नियम १९७९ च्या नियम ८ च्या उप नियम २४ व २५ मधील तरतुदीच्या आधारे विभागीय चौकशी नियमपुस्तिका चौथी आवृत्ती, १९९१ मधील परिच्छेद ६.२९ मध्ये असे स्पष्ट करण्यात आले आहे की, चौकशी प्राधिकाऱ्याने एखाद्या चौकशीमध्ये संपूर्ण किंवा अंशत: पुरावा ऐकून घेतल्यानंतर आणि अभिलिखित केल्यानंतर कोणत्याही कारणास्तव चौकशी प्राधिकारी म्हणून काम करण्याचे थांबवले आणि चौकशी करण्यासाठी चौकशी प्राधिकारी म्हणून नवीन अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात आली तर, नवीन चौकशी प्राधिकारी, त्याच्या पूर्वाधिकाऱ्याने ज्या टप्प्याला चौकशी थांबवली होती, त्या टप्प्यापासून चौकशी पुढे चालू करील आणि त्याच्या पूर्वाधिकाऱ्याने अगोदरच नोंदविलेल्या पुराव्यावरुन किंवा अंशत: पूर्वीच्या प्राधिकाऱ्याने व अंशत: त्याने स्वत: अभिलिखित केलेल्या पुराव्यावरुन पूर्वीच्या चौकशी प्राधिकाऱ्याने ज्या टप्प्याला काम थांबवले तेथून पुढे पुढील कार्यवाही करील.

२. वरील स्पष्टीकरण हे विशेषत: चौकशी अधिकाऱ्याची बदली झाल्यानंतर त्याच्या जागी नियुक्त होणाऱ्या चौकशी अधिकाऱ्याच्या अनुषंगाने आहे. परंतु, एखाद्या प्रकरणात चौकशी अधिकारी त्याच्याकडील विभागीय चौकशी प्रकरणातील कार्यवाही पूर्ण करुन अहवाल लिहिण्यापूर्वी सेवानिवृत्त झालेला असेल तर कोणती कार्यवाही करावी, याबाबत वरील स्पष्टीकरणात कोणताही उल्लेख नाही. ही संदिग्धता दूर करण्यासाठी स्पष्ट करण्यात येते की, म.ना.से.(शिस्त व अपील) नियम १९७९ च्या नियम ८ (२४) (२५) मधील तरतुदी व वरील परिच्छेदात नमूद केलेले विभागीय चौकशी नियमपुस्तिका चौकशी आवृत्ती १९९१ मधील परिच्छेद ६.२९ मधील स्पष्टीकरण विचारात घेता, जेव्हा एखाद्या विभागीय चौकशी प्रकरणातील चौकशी अधिकारी सेवानिवृत्त झालेला असेल तर त्याच्या जागी नियुक्त होणारा चौकशी अधिकारी त्याच्या पूर्वाधिकाऱ्याने चौकशीची कार्यवाही

(कृ.मा.प...

ज्या टप्प्याला थांबविली होती, त्या टप्प्यापासून चौकशी पुढे चालू करील आणि त्याच्या पूर्वाधिकाऱ्याने अगोदरच नोंदविलेल्या पुराव्यावरुन किंवा अंशतः पूर्वीच्या प्राधिकाऱ्याने व अंशतः त्याने स्वतः अभिलिखित केलेल्या पुराव्यावरुन पूर्वीच्या चौकशी प्राधिकाऱ्याने ज्या टप्प्याला काम थांबविले तेथून पुढे पुढील कार्यवाही करील.

३. उपरोक्त मार्गदर्शक सूचना सर्व मंत्रालयीन विभागांनी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व विभागप्रमुख व कार्यालयप्रमुख यांच्या निदर्शनास आणाव्यात.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( भि. रा. वाळवे )
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

मा.मुख्य सचिव,
प्रधान सचिव व विशेष चौकशी अधिकारी १, सामान्य प्रशासन विभाग,
सचिव व विशेष चौकशी अधिकारी २, सामान्य प्रशासन विभाग,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व प्रादेशिक विशेष अधिकारी, विभागीय चौकशा,
सर्व जिल्हा चौकशी अधिकारी, विभागीय चौकशा,
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती.